पुण्य नगरी

# सायबर जनजागृती उपक्रम उत्साहात

**दादर** : व्हॉट नाऊद्वारे आयोजित 'कलयुग में सायबर योद्धा' याविषयावर प्रभावी सायबर जनजागृती उपक्रम कायदा, प्रशासन, शिक्षण, सामाजिक क्षेत्र आणि कला क्षेत्रातील मान्यवरांना एकत्र घेऊन राबवण्यात आला. याला उपस्थितांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

व्हॉट नाऊद्वारे घेण्यात आलेल्या या उपक्रमात आजच्या डिजिटल जगातील वाढत्या सायबर गुन्ह्यांच्या आव्हानांवर चर्चा करण्यात आली. आपले विचार मांडताना महाराष्ट्र सायबर, एडीजीपी यशस्वी यादव यांनी सायबर सुरक्षा ही सर्वांची सामायिक जबाबदारी असल्याचे सांगितले. तसेच नागरिकांना सतर्क आणि सक्रिय राहण्याचे आवाहन केले. याचबरोबर कायदा अंमलबजावणी अधिक बळकट करण्याची गरज असल्याचेही सांगितले.

व्हॉट नाऊच्या संस्थापक आणि समाजसेविका, नीती गोयल, यांनी युवकांना जनजागृतीद्वारे सक्षम करणे हे प्रतिबंधाचे पहिले पाऊल असल्याचे नमूद केले. सायबर गुन्हे आता दैनंदिन वास्तव बनले आहेत आणि कायदेशीर हक्कांची माहिती तसेच वेळेवर कृती करणे संरक्षणासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे अक्षत खेतान यांनी सांगितले.

Mumbai Edition

Apr 30, 2026 Page No. 04